ePaper
राष्ट्रवादीच्या विलीनीकरणाचा निर्णय भाजपच्या शीर्षस्थ नेत्यांना विचारूनच : तटकरे
| वर्ष - 8 | अंक - 340 | UDYAM-MH-26-0158827 |



महाईन्यूज ™

आतील पानांत

- मँचेस्टरआधी टीम इंडियाला धक्का!
- नरम पडणाऱ्या ड्यूक्स चेंडूंची तपासणी
- राजकारणासाठी घुसखोरीला प्रोत्साहन
- छत्तीसगडमध्ये ईडीची मोठी कारवाई

www.mahaenews.com | शनिवार, दि. 19 जुलै 2025 | पुणे, पिंपरी-चिंचवड आवृत्ती | mahaenews.com | लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!

## सतर्क राहा, सतर्क राहा. सतर्क राहा... मराठी माणसांना दिला महामंत्र, जिथे जाल, तिथे मराठीतच बोला

# राज ठाकरेंचे आता गुजरात टार्गेट!

## युपी बिहारनंतर राज ठाकरे प्रथमच गुजराती भाषिकांवर घसरले, प्रथमच केली जहरी टीका

। मुंबई । प्रतिनिधी । महाईन्यूज

**महाराष्ट्रात हिंदी भाषेच्या सक्तीवरुन वातावरण तापलेले असताना राज ठाकरे यांचे मीरारोड येथे जोरदार भाषण झाले.या भाषणात राज ठाकरे यांनी नेहमीच्या ठाकरी शैलीत राज्य सरकार आणि मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यावर कोरडे ओढले.परंतू या भाषणात राज ठाकरे यांनी प्रथमच गुजराती भाषिकांच्या विरोधात जोरदार टीका केली आहे. याआधी राज ठाकरे यांनी युपी बिहारवाल्यांना झोडले आहे,परंतू पहिल्यांदाच त्यांनी गुजराती भाषिक आणि गुजरातला टार्गेट केले आहे.**



राज ठाकरे यावेळी म्हणाले की महाराष्ट्रावर पूर्वीपासून केंद्राचा दबाव आलेला आहे. केंद्राचं हे पूर्वीपासूनचं आहे.काँग्रेस असल्यापासूनचं हे सगळं सुरु आहे. मुंबईसह संयुक्त महाराष्ट्र झाला.त्यासाठी प्रचंड मोठा लढा झाला. मुंबई महाराष्ट्रापासून बाजूला करण्याचा डाव होता. काही गुजराती व्यापारी आणि नेत्यांचा होता असा थेट आरोप राज ठाकरे यांनी प्रथमच केला.

### ... ही पहिली मागणी सरदार पटेल यांनी केली

राज ठाकरे म्हणाले की अत्रेंचे पुस्तक वाचत असताना मला एका गोष्टीचा धक्का बसला. मुंबई महाराष्ट्राला मिळू नये ही पहिली मागणी सरदार वल्लभभाई पटेल यांनी केली होती. वल्लभभाई पटेलांनी. आपण त्यांना लोहपुरुष म्हणून मानत आलो. देशाचे गृहमंत्री. तुम्ही महाराष्ट्राला विरोध केला. ज्या ज्या वेळी महाराष्ट्रात आंदोलनं झाली. तेव्हा मोरारजी देसाई यांनी गोळीबार करून मराठी माणसांना ठार मारलं. अनेक वर्षापासून त्यांचा मुंबईवर डोळा आहे.हे सर्वकाही सहज होत नाही. हे चाचपडून पाहत आहे. हिंदी भाषा आणली बघू महाराष्ट्र विरोध करतो का ? मराठी माणूस पेटतोय का? तो शांत दिसला तर हिंदी भाषा आणणं ही त्यांची पहिली पायरी असेल. हळूहळू मुंबई ताब्यात घ्यायची आणि गुजरातला द्यायची ही त्यांची स्वप्न आहेत असा थेट आरोप राज ठाकरे यांनी या भाषणात पहिल्यांदाच केला आहे.

हा सर्व पट्टा गुजरातला मिळवण्यासाठी राज ठाकरे यावेळी म्हणाले की आम्ही हिंदू आहोत, हिंदी नाही. हिंदुत्वाच्या बुरख्य खालून माझी मराठी संपवायला येणार असाल तर माझ्या सारखा कडवट मराठी सापडणार नाही. हिंमत असेल तर हात लावून दाखवा. हे सर्व षडयंत्र समजून घ्या.

### दुकानं नाही, शाळाही बंद करेन

राज ठाकरे यांनी पुढे बोलताना म्हणाले की,'काल आमचे मुख्यमंत्री फडणवीस, त्यांनी काल सांगितलं म्हणे, तिसरी हिंदी भाषा आम्ही सक्तीची करणार म्हणजे करणार. आता राज्य सरकारला आत्महत्या करायची असेल तर बेशक करावी. त्या दिवशीच्या मोर्चाच्या धसक्याने निर्णय मागे घ्यायला लागला होता. फडणवीस जी, तिसरी भाषा सक्तीची आणणार म्हणजे आणणार. तुम्ही पहिली ते पाचवी हिंदी आणण्याचा प्रयत्न तर करून बघा. दुकानं नाही, शाळाही बंद करेन.' अशा थेट इशारा राज ठाकरेंनी सरकारला दिला आहे.

### हिंदीने 250 भाषा मारल्या

हिंदी ही इकडच्या तिकडच्या कडबोळ्यातून तयार झालेली भाषा. उत्तर प्रदेश, बिहार आणि राजस्थानला समजलं पाहिजे. हिंदीने किती भाषा मारल्या तर २५० भाषा मारल्या आहेत. कानगडी, गढवाली, ब्रज भोजपुरी, माळवी, बिल्ली, पागरी, मारवाडी, अशा अनेक भाषा आहेत. बिहारमध्ये त्यांनी हिंदी स्वीकारली आहे. तिथे ९९ टक्के लोकं मातृभाषेत बोलतात. हिंदीत बोलत नाहीत. हनुमान चालिसा त्याला हे हिंदी म्हणतात पण ती अवधीत आहे. हिंदीत नाही. पहिल्यांदा भाषा नीट समजून घेतली पाहिजे असेही राज ठाकरे यांनी हिंदी भाषेविषयी बोलताना सांगितले.

### दुबे तुमको हम समंदर दुबे दुबे के मारेंगे

राज ठाकरे यांची तोफ आज मीरारोड येथे धडाडली. राज ठाकरे यांनी आपल्या भाषणात हिंदी सक्तीच्या मुद्यावर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यावर जोरदार टीका तर केलीच परंतू भाजपाचे खासदार निशिकांत दुबे यांचाही समाचार घेतला आहे. राज ठाकरे यांनी मीरारोडच्या सभेत मराठी माणूस आणि महाराष्ट्राबद्दल गैरउद्गगार काढणाऱ्या भाजपा खासदार निशिकांत दुब यांच्यावर कठोर भाषेत टीका केली. राज ठाकरे म्हणाले भाजपाचा तो खासदार दुबे की कोण त्याने महाराष्ट्राबद्दल मराठी माणसाबद्दल इतके वक्तव्य केले त्याच्यावर गुन्हा दाखल झाला की नाही याचा हे हिंदी चॅनलवाले पाठपुरवा करणार नाहीत. मी काही बोललो की लगेच आता चालू करतील राज ठाकरेने उगला जहर असेही राज ठाकरे यावेळी म्हणाले.

### माझे सर्व भाषेवर प्रेम

मराठी भाषेचा इतिहास समजून घेतला पाहिजे. यांचं भाषेवर प्रेम नाही. माझं सर्व भाषेवर प्रेम आहे. महाराष्ट्रातील जे काही नेते आहेत त्यांच्या पेक्षा माझं हिंदी बरं आहे. त्याचं कारण माझे वडील. माझ्या वडिलांना व्याकरणासकट मराठी, हिंदी, इंग्रजी आणि ऊर्दू येत होतं. भाषा कोणतीही वाईट नसते. हिंदी वाईट भाषा नाही.पण, आमच्यावर लादणार असाल तर नाही बोलणार जा. लहान मुलांवर तर नाहीच नाही. काही विषयच नाही.

# पुरंदर परिसरात बोगस दस्तनोंदणी!

## महसूलमंत्र्यांची माहिती; प्रस्तावित विमानतळामुळे जमिनींना भाव

। पुणे । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**पुरंदर तालुक्यातील प्रस्तावित विमानतळामुळे जमिनीचे भाव वाढले आहेत. त्या पार्श्वभूमीवर, या परिसरातील गावांमध्ये बोगस दस्तनोंदणी होत आहे का, असा प्रश्न विधानसभेत उपस्थित केला असता, महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी तसे काही प्रकार झाल्याचे सांगितले. शहरालगतचा प्रस्तावित रिंग रोड आणि पुरंदर येथील नियोजित आंतरराष्ट्रीय विमानतळामुळे पुरंदर तालुक्यातील जमिनींची मागणी वाढली आहे. त्यातच पुरंदर तालुक्यामध्येच विमानतळ होणार असल्याचे स्पष्ट झाल्यानंतर येथील जागा खरेदी-विक्रीच्या व्यवहारात लक्षणीय वाढ झाली आहे.**



विमानतळाच्या भूसंपादनाची अधिसूचना जाहीर झाल्यानंतर विमानतळासाठी ज्या सात गावांमध्ये विमानतळ होणार आहे, त्यालगतच्या गावांमधील जमिनीला सोन्याचा भाव आला आहे. या संदर्भात आमदार आशिष देशमुख यांनी तारांकित प्रश्नाद्वारे विमानतळ परिसरातील गावांमधील बोगस दस्तनोंदणीच्या प्रकाराचा मुद्दा विधानसभेत उपस्थित केला होता. त्याला उत्तर देताना महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी ही माहिती दिली.

'पुरंदर तालुक्यातील प्रस्तावित नवीन विमानतळामुळे जमिनींचे भाव वाढल्याने गेल्या काही महिन्यांपासून विमानतळ परिसरातील गावांमध्ये बोगस दस्तनोंदणीचे प्रकार होत आहेत का? बोगस दस्तनोंदणी होत असल्यास बनावट कागदपत्रांद्वारे नव्या खरेदीदाराचे नाव अधिकाऱ्यांच्या संगनमताने सातबारा उताऱ्यावर लावण्यात येत असल्याची बाब खरी आहे का? याप्रकरणी किती गुंतवणूकदारांची आर्थिक फसवणूक करण्यात आली आहे? त्याचा तपशील काय आहे? या सर्व प्रकाराबाबत राज्य शासनाने काय चौकशी केली? आणि कोणावर कोणती कारवाई केली,' अशी विचारणा देशमुख यांनी बावनकुळे यांच्याकडे केली.

त्यावर बावनकुळे यांनी उत्तर दिले, 'विमानतळामुळे बोगस दस्तनोंदणी होत असून, पुरंदर येथील दुय्यम निबंधक श्रेणी-१ यांच्या कार्यालयात मार्च महिन्यामध्ये मौजे खानवडी येथील शेतजमिनीचे साठेखत २५०१/२२५ या क्रमांकाने मूळ मालकाऐवजी नोंदणीकृत झाले आहे. मात्र, बनावट कागदपत्रांद्वारे नव्या खरेदीदाराचे नाव अधिकाऱ्यांच्या संगनमताने सातबारा उताऱ्यावर लावण्यात आलेले नाही, तर मूळ व्यक्तीऐवजी बनावट व्यक्ती असल्याचे स्पष्ट झाल्याने दुय्यम निबंधकांकडून नोंदणी अधिनियमातील तरतुदीनुसार कारवाई करण्यासाठी सासवड पोलीस स्थानकाला पत्राद्वारे सूचना करण्यात आली आहे.' दरम्यान, विमानतळासाठी पुरंदर तालुक्यातील वनपुरी, उदाचीवाडी, कुंभारवळण, एखतपूर, मुंजवडी, खानवडी आणि पारगाव या सात गावांमधील २ हजार ६७३ हेक्टर भूसंपादन केले जाणार आहे. या परिसरात एक गुंठ्यापासून अकरा गुंठ्यांपर्यंतचे प्लॉटिंग करण्यात आल्याची चर्चा आहे. तर दिवे, चांबळी, सोनोरी आणि गराडे या गावांमधील रिंग रोड प्रस्तावित आहे. रिंग रोडसाठी बहुतांश भूसंपादन झाले आहे. रिंग रोडसाठी संपादित झालेल्या जमिनींना समृद्धी महामार्गाच्या धर्तीवर पाचपट दर देण्यात आला आहे.

### पुरंदर परिसरात प्रकार उघड

प्रसंग : पुरंदर तालुक्यातील प्रस्तावित आंतरराष्ट्रीय विमानतळ आणि रिंग रोडमुळे जमिनीचे भाव प्रचंड वाढले.

मुख्य मुद्दा : विमानतळ प्रकल्पामुळे शेतजमिनींची मागणी वाढली असून, त्यामुळे बोगस दस्तनोंदणीच्या घटना घडत असल्याचे महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी विधानसभेत स्पष्ट केले.

विधानसभा प्रश्न : आमदार आशिष देशमुख यांनी बोगस दस्तनोंदणीविषयी तारांकित प्रश्न उपस्थित केला.

मौजे खानवडी येथील शेतजमिनीचे साठेखत क्रमांक २५०१/२२५ हे खरेदीदाराच्या नावाने नोंदवण्यात आले.

# पाच लाखांपुढील कामांची तपासणी

## कामांची तपासणी प्रत्यक्ष जागेवर जाऊन केली जाणार

। पुणे । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**महापालिकेच्या विकासकामांमधील भ्रष्टाचार रोखण्यासाठी महापालिका आयुक्त नवल किशोर राम यांनी लक्ष घातले आहे. त्यानुसार पाच लाखांच्या पुढील प्रत्येक विकासकामाची त्रयस्थ पक्षाकडून (थर्ड पार्टी) तपासणी करणे बंधनकारक करण्यात आले आहे. एकूण कामांच्या दहा टक्के कामांची तपासणी दक्षता विभागामार्फत प्रत्यक्ष जागेवर जाऊन केली जाणार आहे.**




महापालिका आयुक्त नवल किशोर राम यांनी याचे आदेश दिले आहेत. महापालिकेच्या विविध विभागांमार्फत होणाऱ्या पाच लाख रुपयांपेक्षा अधिक रक्कमेच्या विकासकामांची 'थर्ड पार्टी' गुणवत्ता तपासणी करणे बंधनकारक आहे. त्यासाठी 'इंजिनीअर्स इंडिया लिमिटेड' यांची नेमणूक करण्यात आली आहे. या कंपनीकडून तपासणी बंधनकारक आहे. मात्र, अनेकदा संबंधित क्षेत्रीय आयुक्त अथवा खाते प्रमुख या कंपनीमार्फत तपासणी न करता अन्य कंपन्यांकडून तपासणी करून घेत असल्याचे प्रकार समोर आले होते. या प्रकारामुळे विकासकामांमधील गुणवत्तेचा प्रश्न उपस्थित होत होता. तसेच, या कामांमध्ये गैरव्यवहारांचे प्रकारदेखील मोठ्या प्रमाणात घडत होते. महापालिकेकडे याच्या तक्रारीही आल्या होत्या. त्याची गंभीर दखल घेऊन महापालिका आयुक्त राम यांनी देखभाल दुरुस्तीची कामे वगळून पाच लाखांवरील प्रत्येक विकासकामांच्या गुणवत्तेची तपासणी इंजिनिअर्स इंडिया लिमिटेड या संस्थेमार्फत करणे बंधनकारक केले आहे. या कंपनीकडून गुणवत्ता तपासणी करून घेणे शक्य नसेल, तर संबंधित खात्याने अतिरिक्त आयुक्तांची पूर्व परवानगी घेणे बंधनकारक करण्यात आले आहे. सर्व अतिरिक्त महापालिका आयुक्तांनी त्यांच्या अखत्यारीत असलेल्या विभागांकडील किमान दहा अथवा १० टक्के निविदा प्रकरणांची प्रत्यक्ष जागेवर गुणवत्ता तपासणी करावी आणि त्याचा अहवाल आयुक्त कार्यालयाकडे सादर करावा, असे आदेश आयुक्त राम यांनी दिले आहेत. त्यामुळे विकासकामांवर आता प्रशासनाचेही लक्ष राहणार आहे. पुणे महानगरपालिकेचे अंदाजपत्रक सुमारे साडेबारा हजार कोटींच्या घरात गेले आहे. प्रत्येक वर्षी महापालिकेच्या वतीने रस्ते, सांडपाणी, घनकचरा व्यवस्थापन, पावसाळी गटारे, पाणीपुरवठा या पायाभूत सुविधा पुरवण्यासाठी कामे केली जातात. तसेच विविध विभागांमार्फत अनेक छोटी कामे देखील केली जातात. काही कामे केवळ कागदावर दाखवण्यापूर्ती मर्यादित असतात.

### दलालांना बसणार चाप

महापालिका प्रशासनातील कामचुकार अधिकाऱ्यांवर अंकुश लागणार आहे. महापालिकेच्या विकासकामांमधील भ्रष्टाचार रोखण्यासाठी महापालिका आयुक्त नवल किशोर राम यांनी लक्ष घातले आहे. त्यानुसार पाच लाखांच्या पुढील प्रत्येक विकासकामाची त्रयस्थ पक्षाकडून (थर्ड पार्टी) तपासणी करणे बंधनकारक करण्यात आले आहे.

## आ. महेश लांडगे यांनी विविध मुद्यांवर राज्य सरकारचे लक्ष वेधले

# “विकासाभिमुख हिंदूत्व”चा अजेंडा अन् विधानसभा अधिवेशनामध्ये “दस का दम”!

## समस्या, विकासकामे अन् धर्मांतराच्या मुद्यावरही मांडली रोखठोक भूमिका

। पिंपरी-चिंचवड । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**राज्य विधिमंडळाचे पावसाळी अधिवेशनाचा समारोप झाला. विविध मुद्यांवर हे अधिवेशन गाजले. पिंपरी-चिंचवडसह पुणे परिसरातील विविध प्रश्नांवर सभागृहात चर्चा झाली. भाजपा आमदार महेश लांडगे यांनी अधिवेशनात मांडलेल्या 10 प्रश्नांवर सकारात्मक चर्चा झाली. यामध्ये हिंजवडी आयटी पार्क समस्यांपासून चाकण औद्योगिक पट्ट्यातील वाहतूक समस्यांसह पिंपरी-चिंचवडच्या प्रारुप विकास आराखड्यावर रोखठोक भूमिका मांडली. आयटी फोरम आणि सोसायटी फेडरेशनच्या इतिहासामध्ये पहिल्यांदाच मुख्यमंत्री-उपमुख्यमंत्री यांनी शिष्टमंडळाला वेळ दिला आणि प्रशासन खडबडून जागे झाले. अधिवेशनात आमदार लांडगे यांच्या लक्षवेधी, औचित्याचा मुद्दा आणि प्रश्नोत्तराच्या तासामध्ये “दस का दम” पहायला मिळाला.**




मुंबई येथील विधान भवनमध्ये दि. 31 जूनपासून पावसाळी अधिवेशनाला सुरूवात झाली. शनिवार आणि रविवार असे दोन दिवस कामकाज बंद असते. त्यामुळे एकूण 15 दिवस सभागृहाचे कामकाज चालले. या काळात आमदार महेश लांडगे यांनी सभागृहामध्ये महानगरपालिकेचा प्रारुप विकास आराखडा, हिंजवडी आयटी पार्क समस्या, चाकण औद्योगिक पट्ट्यातील समस्या, प्राधिकरणाच्या हद्दीतील मिळकती “फ्री होल्ड” करणे, पुणे, पिंपरी-चिंचवडमधील वाहतूक कोंडीची समस्या, पुणे-नाशिक महामार्गावरील नाशिक फाटा ते खेड एलिव्हेटेड कॉरिडॉरसाठी भूसंपादन कामी निधी उपलब्ध करणे, जीएसटी फसवणूक रॅकेट, चिखली घरकूलवासीयांची घरपट्टी माफ करणे, नदी सुधार प्रकल्प, पर्यावरण संवर्धनाचा प्रश्न यासह दारुबंदी विधेयकावर सकारात्मक भूमिका मांडली आणि राज्य सरकारकडे सर्वसामान्य पिंपरी-चिंचवडकरांची बाजू सक्षमपणे मांडली. दरम्यान, आमदार लांडगे यांनी राज्याचे वनमंत्री गणेश नाईक यांच्या माध्यमातून मौजे डुडुळगाव येथील वन विभागाच्या हद्दीतील रस्त्यासह विकासकामांना महापालिका प्रशासनास “एनओसी” द्यावी याकरिता पाठपुरावा केला. या रस्त्याची पाहणी अधिकाऱ्यांनी केली. भोसरीसह पिंपरी-चिंचवड शहरातील वीज समस्या सोडवण्यासाठी उर्जा विभागाकडे पाठपुरावा करण्यात आला. त्याद्वारे दिघी कॅम्प शाखेला महावितरण प्रशासनाने मंजुरी दिली. त्यामुळे भोसरी, दिघी आणि चऱ्होली असे तीन विभाग महावितरणचे होणार आहेत.

### हिंजवडी आयटी पार्कची समस्या मुक्तीकडे वाटचाल...

पिंपरी-चिंचवड, पुणे शहराची आंतरराष्ट्रीय पातळीवर ओळख असलेला हिंजवडी आयटी पार्क समस्यांच्या गर्तेत आहे. पायाभूत सोयी-सुविधा आणि वाहतूक कोंडीविरोधात आयटीयन्सनी “अनक्लॉग हिंजवडी” ही मोहीम सुरू केली. आमदार महेश लांडगे यांच्याकडे आयटीयन्स आणि सोसायटीधारक प्रतिनिधींनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे बैठक लावण्याची विनंती केली होती. त्यानंतर तात्काळ पाठपुरावा करीत सदर बैठक घेण्यात आली. त्यात प्रशासनाला कार्यवाहीचे आदेश दिले. विशेष म्हणजे, हिंजवडीची आयटी पार्क कोंडीमुक्त करण्यासाठी प्रशासनाने कार्यवाहीसुद्धा सुरू केली. भूमकर चौक, माण आणि लगतच्या परिसरातील अतिक्रमणे हटवण्यात येत आहेत. त्यामुळे हिंजवडी आयटी पार्कची समस्या मुक्तीकडे वाटचाल सुरू झाली आहे, असे चित्र स्पष्ट दिसते.

### भूमिपुत्रांसाठी उठवला आवाज...!

पिंपरी-चिंचवड शहराचा प्रारुप विकास आराखडा महानगरपालिका प्रशासनाने प्रसिद्ध केला आहे. त्याच्या हरकती आणि सूचना मागवल्या आहेत. प्रशासनाने अनावश्यक आरक्षण टाकू नये. शहरातील मंदिरे आणि धार्मिक स्थळांच्या जागांमध्ये आरक्षण नको. यामध्ये मोशी नागेश्वर महाराज मंदिर आणि रुपीनगर येथील वाघजाईमाता मंदिराचा उल्लेख करीत आमदार महेश लांडगे यांनी डीपी शहराच्या हितासाठी करावा. पण, भूमिपुत्र भूमीहिन होता कामा नये. गोरगरिबांच्या घरांवर कारवाई करुन विकास साधता येणार नाही, अशी परखड भूमिका सभागृहात मांडली. पिंपरी-चिंचवडकरांनी मांडलेल्या हरकती आणि सूचनांची पारदर्शीपणे पडताळणी करावी आणि सर्वसमावेशक व भूमिपुत्रांच्या हक्कांचे रक्षण करणारा विकास आराखडा निश्चित करावा, अशी मागणी केली. पिंपरी-चिंचवड नवनगर विकास प्राधिकरणाच्या हद्दीत पूर्वी बांधलेल्या मिळकती आता महापालिकेच्या कार्यक्षेत्रात आहेत. त्या “फ्री होल्ड” कराव्यात. तसेच, प्राधिकरणाने लोकांना लॉटरी पद्धतीने दिलेल्या जागांवर रेडझोनची सिमारेखा दाखवली आहे, ती रेडझोनमुक्त करावी. यासह शासकीय इमारती आता वापरात नाहीत. त्या जीर्ण झाल्या आहेत. त्यांचा पुनर्विकास करण्यासाठी महापालिकेकडे हस्तांतरण करण्याची मागणी केली. त्याला कॅबिनेट मंत्री उदय सामंत यांनी सकारात्मक उत्तर दिले.

### देव-देश अन् धर्मासाठी कटिबद्ध...

विकासाच्या मुद्यांसह आमदार महेश लांडगे यांनी देव-देश अन् धर्मासाठी कटिबद्ध असल्याचे अधिवेशनाच्या निमित्ताने पुन्हा एकदा अधोरेखित केले. धर्मांतराचा मुद्दा सभागृहात चांगलाच गाजला. सांगली येथील ऋतुजा राजगे यांनी “प्राण सोडला पण धर्म सोडला नाही..” असा उल्लेख करीत राज्यात धर्मांतर बंदी कायदा लागू करावा, अशी मागणी केली. यावेळी राष्ट्रवादीचे शरद पवार पक्षाचे आमदार जयंत पाटील आणि जितेंद्र आव्हाड यांनी अल्पसंख्याक समाज भीतीच्या सावटाखाली आहे, असा दावा सभागृहात केला. त्यांवेळी “आमच्या दहा-आकरा वर्षांच्या मुलींवर अत्याचार झाले.. त्यावेळी तुम्ही का बोलला नाही..” असा आक्रमक पवित्रा आमदार लांडगे यांनी घेतला. हा मुद्दा महाराष्ट्रभरात गाजला. राज्यातील गुरव, पुजारी, मानकरी समाजाला देवस्थान विश्वस्त संस्थांमध्ये हक्क मिळावा. यासाठी कायद्यात सुधारणा करण्याची मागणी केली. ‘जीएसटी’ फसवणूक प्रकरणातील महोम्मद रेहमानी याच्यासह साथीदारांवर मोक्का लावावा. राज्यातील गोरक्षकांचे सरंक्षण करावे, अशा हिंदूत्वाच्या मुद्यांवरही आमदार महेश लांडगे यांनी सभागृह गाजवले.

> “पिंपरी-चिंचवडसह पुणे परिसराच्या विविध मुद्यांवर विशेषत: वाहतूक कोंडी, पर्यावरण संवर्धन, नदी सुधार प्रकल्प आणि सर्वसामान्य नागरिकांना मिळणाऱ्या पायाभूत सोयी-सुविधा यासाठी आम्ही सातत्याने काम करीत आहोत. अधिवेशनाच्या निमित्ताने संबंधित मंत्रीमहोदय यांनी सकारात्मक उत्तरे दिली आहेत. त्यासाठी आगामी काळात राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या मार्गदर्शनाखाली पाठपुरावा करणार आहोत. विकासाभिमुख हिंदूत्व ही आमच्या राजकीय व सामाजिक जीवनाची “लाईन ऑफ ॲक्शन” आहे.
>
> **-महेश लांडगे,** आमदार, भाजपा, पिंपरी-चिंचवड, पुणे.

# आम्हाला महापालिकेत सामावून घ्या!

## जांबे, सांगवडेच्या सरपंचांचे आयुक्तांना पत्र

। पिंपरी-चिंचवड । प्रतिनिधी : महाईन्यूज ।

**हिंजवडी आयटी पार्कसह सात गावांचा पिंपरी-चिंचवड महापालिकेत समावेश करण्याचा मुद्दा ऐरणीवर आला आहे. त्यातच जांबे आणि सांगवडे ग्रामपंचायतीकडून महापालिका आयुक्त तथा प्रशासक शेखर सिंह यांना पत्र देत आमच्या गावचा महापालिकेत समावेश करावा, अशी थेट मागणी करण्यात आली आहे.**

तसेच, पुणे जिल्ह्याचे पालकमंत्री तथा उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्याकडेही पत्राद्वारे तशीच मागणी करण्यात आली आहे. सातपैकी दोन गावांनी थेट पत्र देऊन पिंपरी-चिंचवडमध्ये समावेश करण्यास अनुकूलता दर्शविल्याने ती सर्व गावे समाविष्ट करण्याची मागणी जोर धरत आहे. महापालिकेत आमचे गाव समाविष्ट करावे, असे पत्र जांबेच्या सरपंच द्रौपती जगताप आणि सांगवडेचे सरपंच रोहन जगताप यांनी दिले आहे.

त्यांनी दिलेल्या पत्रात म्हटले की, राजीव गांधी इन्फोटेक पार्कमुळे रोजगार आणि व्यावसायिक संधी उपलब्ध झाल्या. त्यामुळे देशभरातून नागरिक आमच्या भागात वास्तव्यास येत आहेत. ही संख्या काही लाखाच्या घरात असून, नागरीकरण वाढले आहे.

आमच्या गावातील अतिशय कमी तसेच, अरुंद रस्ते आहेत. या रस्त्यांमुळे सतत वाहतूक कोंडी, अपघातासह अन्य समस्यांना तोंड द्यावे लागत आहे. दररोज कचरा उचलण्यासाठी परिपूर्ण यंत्रणा नसल्याने सगळीकडे घाण व दुर्गंधी पसरली आहे. वारंवार रस्त्याच्या कडेला कचरा पडून राहिलेला असतो. सक्षम ड्रेनेजलाईन यंत्रणा नसल्याने दुर्गंधी व आरोग्यविषयक समस्या उद्भवत आहेत. अनियंत्रित बकालपणामुळे वादविवादाच्या घटनामध्ये वाढ होत असून, यामुळे कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न भविष्यात निर्माण होऊ शकतो.


आमच्या परिसरातील नागरिकांना शुध्द व पुरेसे पाणी उपलब्ध होत नसल्याने आरोग्याच्या तक्रारी वाढत आहेत. नव्याने रस्ते विकसित होत नसून, नवीन उद्याने, दवाखाने, शाळा, आरोग्य विषयक सोयी-सुविधा व इतर गोष्टीची उपलब्धता होत नाही. तसेच, अनेक समस्यांमुळे आयटी पार्कमधील अनेक कंपन्या इतर राज्यामध्ये स्थलांतरीत झाल्याने शासनाचा हजारो कोटीचा महसूल बुडाला आहे.



### म्हणून जायचे महापालिकेत

यासह दैनंदिन अनेक समस्या व प्रश्न ‘जैसे थे’ आहेत. अनेक अडचणी, समस्या सोडवणूक करण्यास ग्रामपंचायतीने पाठपुरावा करुनही सुटत नाहीत. भविष्यात देखील ह्या समस्या ग्रामपंचायतीच्या आवाक्याच्या बाहेर गेलेल्या आहेत.

## नाम हा परमात्म्याकडे जाण्याचा राजमार्ग »



### साक्षित्वाने राहाणाऱ्याला दुःखाची बाधा नाही.

देहबुद्धी आहे तोवर, म्हणजे 'मी देही आहे' ही भावना आहे तोपर्यंत, काळजी राहाणारच. काळजी मनातून असते. जोवर संशय फिटत नाही, परमेश्वराचा आधार वाटत नाही, तोवर काळजीही मनाला सोडीत नाही. कुंडलीतल्या ग्रहांच्या अधिकाराची मर्यादा देहापर्यंतच आहे. पैसा किती मिळेल हे त्यावरून सांगता येईल, भगवंताकडे किती कल आहे हे सांगता येईल, पण भगवंताची प्राप्ती होईल की नाही हे सांगता येणार नाही. मनुष्यजन्म येऊनही भगवंताची प्राप्ती झाली नाही, तर जिवाचे फार नुकसान आहे. भगवंताच्या प्राप्तीची मनापासून तळमळ लागायला पाहिजे. एकदा का अशी तळमळ लागली की मनुष्य वेडा बनतो, आणि कोणी संत भेटला की निवांत होतो. संत आपल्यावर येणारी संकटे नाहीशी करीत नाहीत, तर त्या संकटांची भीती नाहीशी करतात. संकटापेक्षा संकटाची भीतीच आपल्याला फार घाबरवून सोडते. 'आपल्याला जे कळले ते लोकांना कळून लोक सुखी होऊ द्या,' हा संतांचा एकच हेतू असतो. संत विषयावर मालकी गाजवितात. जगाला जिंकणे एक वेळ सोपे, पण स्वत:ला जिंकणे कठीण आहे. संत स्वत:ला जिंकून जगात वावरत असतात. संत साक्षित्वाने जगात राहतात, आणि साक्षित्वाने राहणाऱ्याला दु:खाची बाधा होत नाही. संतांच्या संगतीत राहून, त्यांच्या आज्ञेत राहून, आपण आपल्या मनातले सर्व संशय नाहीसे करावेत. वास्तविक, संतांच्या आज्ञेचे एकनिष्ठपणाने जो पालन करतो, त्याचे संशय आपोआप दूर होतात. जोवर संशय आहे तोवर असमाधान आहे. समाधान हे आपले आपल्यालाच घ्यायचे असते. म्हणून, ज्याला समाधानी राहायचे आहे, त्याने फार धडपड करू नये; जशी स्थिती येईल त्या स्थितीत समाधानात राहावे. कचेरीचे विचार आपल्याबरोबर घरी आणू नयेत; ते तिथेच ठेवावेत. घरातले वातावरण शुद्ध आणि नि:संशयाचे असावे. भोळेपण एकप्रकारे चांगले; ती भाग्याची गोष्ट आहे. जो योगभ्रष्ट असतो त्याच्या अंगी भोळेपण असते; जसे कल्याणस्वामींच्या अंगी होते. झालेल्या गोष्टी विसरून जाण्यातच खरा आनंद आहे; पण ते विसरणे कृत्रिमपणे न आणता, भगवंताच्या स्मरणात राहिल्याने आले पाहिजे. म्हातारपणी मन आणि शरीर फार नाजूक बनते. त्या वेळी शरीरसुद्धा बरे राहायला, आनंद हे फार मोठे औषध आहे. हसावे, खेळावे, लहान मुलांत मिसळावे, थट्टा-विनोद करावा; काहीही करावे, पण आनंदात राहावे. ज्याचा आनंद कायम टिकला, त्याच्याच जन्माचे सार्थक झाले.

बोधवचन:- समाधान ही परमेश्वराची देणगी आहे. ती मिळविण्याचा उपाय म्हणजे भगवंताचे स्मरण होय.



'स्टेट'मेंट
अधिकराव दिवे-पाटील
संस्थापक, संपादक

**हल्ली आपल्या राजकारणात सतत आरोप-प्रत्यारोप असतील किंवा तणाव असेल तर तो बातम्यांच्या स्वरुपात सगळीकडे तातडीने पोहोचतो. पण, बातम्या हा प्रकार 'अधिक पाणी झाले, की ताक कसे पांचट' होते, तसा झाला आहे. जवळपास काहीही अभ्यास नसलेले, संदर्भ माहिती नसलेले चमकोगिरी करणारे तथाकथित विश्लेषक पड्यावर येतात आणि मग वटवट सुरु होते, नको तसे अकलेचे तारे तोडले जातात !**

# फडणवीस यांच्या गंमतीची धमाल, बातमी व्हायरल; चॅनल्सची कमाल !



### माहिती नसते, तरी टकळी सुरू..

दुसरी गोष्ट म्हणजे आपल्याला फारसे बोलू दिले जात नाही, हे माहिती असूनही प्रवक्ते वगैरे देखील चर्चेत सहभागी होतात. चॅनल्समधील बहुतेक अँकर 'मी तुम्हाला जरा थांबवतो', असे म्हणून स्वतःची टिमकी वाजवून घेत असतात. असे थांबवतो म्हणणाऱ्यांकडे त्यांच्या ठराविक शब्दांपलीकडे फारसे शब्द भांडारही नसते तो भाग वेगळा.. ते अपेक्षित धरायचे आणि त्याकडे दुर्लक्ष करायचे !

### किस्सा विधान परिषदेतील..

विधान परिषदेत विरोधी पक्षनेते अंबादास दानवे यांची मुदत संपल्यामुळे त्यांना औपचारिक निरोप देण्यासाठी कार्यक्रम झाला. त्यात गंमतीजमती होणे अपेक्षित होते.. आणि तसे झालेही ! अंबादास दानवे परत सभागृहात येतील, अशा शुभेच्छा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिल्या. मग सत्ताधारी आणि विरोधी अशा गोष्टी सुरु झाल्या, तेव्हा माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांना उद्देशून फडणवीस म्हणाले की, आम्हाला २०२९ पर्यंत विरोधी पक्षात बसण्याची गरज नाही, पण तुम्हाला मात्र इकडे येण्यास वाव आहे, वगैरे वगैरे.. कोणत्याही सूज्ञ पत्रकाराला यातील गंमत लक्षात आली असती आणि ही एक कोपरखळी आहे, असे म्हणून त्यांनी सुद्धा ते वक्तव्य गांभीर्याने घेतले नसते..पण मग त्यात पत्रकारिता ती काय ?

### मस्करी आणि अफवांची तस्करी..

हे अत्यंत गंमतीने केलेले विधान बातमी देताना गंमतीने देणे आवश्यक आहे. पण, ते तसे न होता मुख्यमंत्री फडणवीस यांचे उद्धव ठाकरे यांना आवाहन, उद्धव ठाकरे यांना ऑफर, महाराष्ट्रात नव्या राजकीय भूकंपाची चिन्हे वगैरे बातम्या चॅनल्स वरून सुरू झाल्या.. शीर्षकासहित अशा बातम्या वृत्तपत्रांमध्ये ही छापून आल्या आणि मग खऱ्या अर्थाने पत्रकारिता उघड पडली.

### राज ठाकरे यांच्याकडून वाभाडे..

महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे अध्यक्ष राज ठाकरे यांनी इगतपुरी येथे शिबिरात या विषयावर पत्रकारांचे अक्षरशः वाभाडे काढले आहे. प्रचंड पीक आले म्हणजे कांदे, बटाटे, टोमॅटो खराब निघण्याची शक्यता अधिक असते. तसे भारंभार वाहिन्या सुरु झाल्यामुळे दर्जा किती खालावलेला आहे, हे लक्षात येते. यामुळे वाचणे आणि बातमी बघणे हेही टाळले जाऊ लागले आहे. राज्यात स्थापन होणारे सरकार पाच वर्षांसाठी असते. ते मधेच अस्थिर झाले, तर वेगळे सरकार येऊ शकते. तशी परिस्थिती महाराष्ट्राने बघितली. २०१९ मध्ये उद्धव ठाकरे मुख्यमंत्री झाले ते अशाच अनपेक्षित पद्धतीने !

### आनंद तरी कशात मानायचा ?

त्याचा मुख्य आनंद झाला तो महाराष्ट्रातील वाहिन्यांना. त्या वेळी शरद पवार आणि उद्धव ठाकरे यांनी भाजपला कसे 'चेकमेट' केले यावर पुस्तके झाली. पण, दोन अडीच वर्षांत ते हंगामी पीक आहे, हे सिद्ध झाले.आता २३५ पेक्षा अधिक आमदार असलेले सरकार सत्तेवर आहे. यातील एक पक्ष फुटला तरीही सरकार पडणार नाही. विरोधी पक्षांकडे कशाबशा पन्नास जागा आहेत. या पन्नास जागांमध्ये ९५ जागांची भर घालून वेगळे सरकार आणण्याचा विचार देखील राजकीय नेते करीत नाहीत, पण वाहिन्यांवर सुरु असतो नुसता दंगा आणि स्वप्नातील ठोकताळे !

### तासन् तास रवंथ करणे सुरूच..

राज ठाकरे आणि उद्धव ठाकरे एकत्र येणार हे वृत्त कित्येक दिवस वाहिन्यांवर चालवण्यात आले खरे, पण डिसेंबर ची तारीख पडली आहे. तरीही थापा मारणे सुरु आहे. एखादा विषय संपवण्याचे आम्हाला माहीतच नसते. जनावरांप्रमाणे तोंडात घास घ्यायचा आणि तासन् तास रवंथ करत बसायचे, दुर्दैवाने हीच आजची पत्रकारिता होऊ लागली आहे. फक्त विषय मिळायचा अवकाश.. आणि तो मिळाला नाही तरी मनात एक खोटा मुद्दा ठेवायचा आणि तो खरा कसा होऊ शकतो, हे बिंबवायचे धंदे सुरू आहेत.

### सगळाच आनंदीआनंद , पुढे काय ?

या सर्व उथळपणाचा परिणाम असा की एकंदर वाहिनी या प्रकाराला लोक कंटाळून गेले आणि मुख्य म्हणजे विश्वासार्हता झपाट्याने कमी होऊ लागली आहे. फडणवीस आणि आदित्य ठाकरे यांची जाता जाता भेट झाली, ही महाराष्ट्रासाठी मोठी बातमी आहे का ? आणि चाणाक्ष आणि हुशार राजकारणी संजय राऊत यांना तर वाहिन्यांनी तंबाखू मळावी, तसे मळत ठेवले आहे.

### पुडी सोडली, की लागले धावायला..

एखाद्या नोकराला मालकाच्या शिव्या खाल्ल्याशिवाय जेवण जात नाही, तसे महाराष्ट्रातील जनतेला, वरिष्ठ नेत्याना,चार शिव्या दिल्याशिवाय संजय राऊत यांना झोप येत नसावी. म्हणून एकनाथ शिंदे यांनी आम्ही भाजपमध्ये विलीन होतो, मला मुख्यमंत्री करा, अशी अमित शहा यांना विनंती केल्याची पण, तशी वस्तुस्थिती नसल्याची माहिती दिली आणि लहान पोराने भूकंप झाला, असे म्हटल्यावर सगळ्या मोठ्या माणसांनी पळत सुटावे, तसे वाहिनीवाले पळत सुटले. राजकीय अज्ञान किती असावे याचा हा भंपक नमुनाच म्हणावा लागेल ! संजय राऊत रोज सकाळी एक पुढे सोडतात आणि आमची भंपक मीडिया त्यामागे दिवसभर धावत सुटते. पण, वाहिन्यांनी त्यांच्या मागे फरपटत जाऊन आपले पायजमे फाडून घ्यावेत असे थोडेच आहे. उलट राऊत यांचे पोरकटपणाचे विधान, अशी बातमी द्यायला हवी. पण, भान हरपलेल्या अवस्थेत सध्या वाहिन्या वहात सुटल्या आहेत. विश्वासार्हता गेली की परत मिळवणे सोपे नसते, हे लक्षात घ्यायला हवे !

### चमकोगिरी, उथळपणा आणि चंगळवाद

पण उथळपणा, चमकोगिरी, चंगळवाद, आणि पाहणाऱ्या ग्राहकाला वाटेल ते मटेरियल देण्याची सुविधा असल्याप्रमाणे भरकट चाललेली मीडिया, कधी सुधारणार देव जाणे ! आज वाईट याचे वाटते, की वैष्णवी हगवणे हत्या प्रकरणाची बातमी सलग तीन दिवस नॉनस्टॉप दाखवणाऱ्या आमच्या मीडियामध्ये डॉ. जयंत नारळीकर यांचे निधन अशा बातम्या कोपऱ्यात फेकल्या गेल्या, त्याची खंत वाटते..आणि या मंडळींना सुबुद्धी मिळो एवढीच प्रार्थना करावीशी वाटते !

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक-संपादक श्री. अधिकराव दिवे- पाटील** यांनी छत्रपती शिवाजी महाराज गोल मंडई, गाळा क्र. ७९/८०, संत तुकारामनगर, पिंपरी, पुणे- 411018 येथे पुणे विभागीय कार्यालयामधून प्रसिद्ध केले आहे. एमएसएमई नोंदणी क्रमांक : MH-26-0158827. या वृत्तपत्रात डिजिटल स्वरुपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक-संपादक सहमत असतीलच असे नाही.
**कार्यकारी संपादक : वैष्णव जाधव । मुख्य कार्यकारी संपादक : सुनील आढाव.** (*सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील) विशेष सूचना: हा अंक कोणत्याची प्रकारच्या प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.

# अभिजात दर्जा मिळाल्यानंतरही दुर्लक्ष

## मिराभाईंदर येथील सभेत राज ठाकरे यांचा आरोप



। मुंबई ।
प्रतिनिधी : महाईन्यूज ।

**मुंबईपासून पालघरपर्यंत परप्रांतीयांचा प्रभाव राहील असे मतदारसंघ तयार केले जात आहेत. यात मराठी माणसाला हटविले जात असल्याचा आरोप महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे (मनसे) अध्यक्ष राज ठाकरे यांनी केला. पुढे हा भाग गुजरातला जोडण्याचा डाव असल्याचा दावा त्यांनी मिरा रोड येथील सभेत केला. हिंदी सक्तीच्या मुद्द्यावरून मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यावरही राज यांनी जोरदार टीका केली.**

मराठी विजयी मेळावा आणि मिरा भाईंदर येथील मोर्चानंतर पहिल्यांदाच राज ठाकरे यांची शुक्रवारी मिरा-भाईंदर येथे जाहीर सभा पार पडली. या वेळी त्यांनी कार्यकर्त्यांशी संवाद साधला. या सभेला प्रचंड प्रतिसाद मिळाला. हिंदी भाषेची सक्ती करून मुंबईवर नियंत्रण मिळवण्याचा हा सरकारचा प्रयत्न आहे. यामागे देवेंद्र फडणवीस खटपट करत असल्याची टीका त्यांनी केली. मात्र कोणत्याही परिस्थितीत हिंदीची सक्ती स्वीकारली जाणार नाही. राज्य सरकारने हिंदी सक्तीचा प्रयत्न करून पाहावा, केवळ दुकाने नाही तर शाळाही बंद पाडू असा इशारा त्यांनी दिला. मराठी माणूस हा महाराष्ट्राचा मालक आहे. माज घेऊन जर कोणी अंगावर आला तर त्याला ठेचल्याशिवाय राहणार नाही हे महाराजांचे हिंदवी राज्य आहे. आम्ही कुणाचे गुलाम नाहीत. या प्रांतावर अधिकार असेल तो मराठी माणसाचा आहे असे त्यांनी ठणकावले.केंद्र शासनाने मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा देण्याचा निर्णय वर्षभरापूर्वी घेतला आहे. तरी आजतागायत त्यासाठी एक रुपयाही निधी दिला नाही.चित्रपटसृष्टी वगळता, हिंदी भाषेने कोणाचेही भले केलेले नाही. तरीही सरकार हिंदीला मोठे करण्याचा प्रयत्न करत आहे. एकट्या हिंदी भाषेमुळे अडीचशेहून अधिक मातृभाषांचे नुकसान केले आहे. मात्र, महाराष्ट्रात हिंदीचे हे प्रयत्न यशस्वी होऊ देणार नाही असेही राज ठाकरे यांनी सभेत सांगितले.मराठी – हिंदी भाषा वादावरून भाजपचे खासदार निशिकांत दुबे यांच्या वादग्रस्त वक्तव्यावर राज यांनी टीका केली. मुंबईत येऊन दाखवा असे आव्हान त्यांनी दुबे यांना दिले. मराठी विजयी मेळावा आणि मिरा भाईंदर येथील मोर्चानंतर पहिल्यांदाच राज ठाकरे यांची शुक्रवारी मिरा-भाईंदर येथे जाहीर सभा पार पडली. या वेळी त्यांनी कार्यकर्त्यांशी संवाद साधला. या सभेला प्रचंड प्रतिसाद मिळाला. हिंदी भाषेची सक्ती करून मुंबईवर नियंत्रण मिळवण्याचा हा सरकारचा प्रयत्न आहे.मात्र कोणत्याही परिस्थितीत हिंदीची सक्ती स्वीकारली जाणार नाही. राज्य सरकारने हिंदी सक्तीचा प्रयत्न करून पाहावा, केवळ दुकाने नाही तर शाळाही बंद पाडू असा इशारा त्यांनी दिला. मराठी माणूस हा महाराष्ट्राचा मालक आहे. माज घेऊन जर कोणी अंगावर आला तर त्याला ठेचल्याशिवाय राहणार नाही हे महाराजांचे हिंदवी राज्य आहे. आम्ही कुणाचे गुलाम नाहीत. या प्रांतावर अधिकार असेल तो मराठी माणसाचा आहे असे त्यांनी ठणकावले.

### वादग्रस्त वक्तव्याव टीका

केंद्र शासनाने मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा देण्याचा निर्णय वर्षभरापूर्वी घेतला आहे. तरी आजतागायत त्यासाठी एक रुपयाही निधी दिला नाही.चित्रपटसृष्टी वगळता, हिंदी भाषेने कोणाचेही भले केलेले नाही. तरीही सरकार हिंदीला मोठे करण्याचा प्रयत्न करत आहे. एकट्या हिंदी भाषेमुळे अडीचशेहून अधिक मातृभाषांचे नुकसान केले आहे. मात्र, महाराष्ट्रात हिंदीचे हे प्रयत्न यशस्वी होऊ देणार नाही असेही राज ठाकरे यांनी सभेत सांगितले. मराठी – हिंदी भाषा वादावरून भाजपचे खासदार निशिकांत दुबे यांच्या वादग्रस्त वक्तव्यावर राज यांनी टीका केली. मुंबईत येऊन दाखवा असे आव्हान त्यांनी दुबे यांना दिले.मुंबईपासून पालघरपर्यंत परप्रांतीयांचा प्रभाव राहील असे मतदारसंघ तयार केले जात आहेत. यात मराठी माणसाला हटविले जात असल्याचा आरोप महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे (मनसे) अध्यक्ष राज ठाकरे यांनी केला.

# पैसे घेऊन विधिमंडळाचे प्रवेशपत्र ?

## विधान परिषदेत कुणी आरोप केला, एका प्रवेशपत्राचा दर किती ?



। मुंबई ।
प्रतिनिधी : महाईन्यूज ।

**विधीमंडळात पैसे घेऊन प्रवेशपत्र दिले जाते. असे प्रवेशपत्र देणारी टोळी कार्यरत आहे. वेळनिहाय आणि प्रवेशद्वारनिहाय वेगवेगळे दर आहेत. अशा प्रकारे बेकायदा प्रवेशपत्र दिले जात असल्यामुळे विधीमंडळात गर्दी होते, हाणामारी होते, अशी टीका शशिकांत शिंदे आणि अनिल परब यांनी विधान परिषदेत केली.**

विरोधी पक्षनेते अंबादास दानवे यांनी औचित्याच्या मुद्द्याद्वारे जितेंद्र आव्हाड आणि गोपीचंद पडळकर यांच्या कार्यकर्त्यांमध्ये झालेल्या मारामारीच्या घटनेवर सविस्तर चर्चेची मागणी केली. सत्ताधारी पक्षाचा आमदार मारहाण करण्यासाठी आपल्या कार्यकर्त्याला उसकवत असल्याचे दिसून येते. पोलिस आरोपीला तंबाखू मळून देत असल्याचे चित्रफितीत दिसत आहे, असेही दानवे म्हणाले.शशिकांत शिंदे यांनाही या विषयावर चर्चेची मागणी केली. सदस्यांमधील वैयक्तिक द्वेष, दुश्मनी वाढली आहे. विधिमंडळाच्या बाहेर दिसणारे चित्र आज आवारात दिसले आहे. आमदार सना मलिक यांनी विधीमंडळातील गर्दीतून वाट काढणे अवघड होत असल्याचे म्हटले आहे. विधिमंडळातील प्रवेशपत्राचा दर पाच हजार रुपये इतका आहे. सभापतींनी प्रवेशपत्र देणे बंद करण्याचे निर्देश दिले होते, तरीही प्रवेशपत्र कसे दिले गेले.

सभापतींच्या निर्देशांनंतरही विधिमंडळात गर्दी कशी होते. मंत्र्यांनी प्रवेशपत्र दिले नाही तर पैसे देऊन प्रवेशपत्र मिळवून कार्यकर्ते पास मिळवितात. त्यामुळेच गर्दी होते, असा आरोपही शिंदे यांनी केला.

विधिमंडळाच्या कार्यालयाची इज्जत जावू नये, म्हणून आम्ही गप्प आहोत. सर्रास पैसे घेऊन बेकायदा प्रवेशपत्र दिले जाते. असे बेकायदा प्रवेशपत्र देण्याची पद्धत काय आहे.

### आम्ही गप्प आहोत


कोणत्या गेटमधून जाण्यासाठी किती पैसे घेतले जातात. याचे पुरावे देण्यास तयार आहे, आमचे आरोप आम्ही प्रतिज्ञापत्राद्वारे देऊ शकतो, असे अनिल परब म्हणाले. परब यांच्या आरोपला उत्तर देताना, परब यांनी पैसे घेऊन प्रवेशपत्र दिले जात असल्याचे पुराव्यासह मांडावे सरकार त्याची चौकशी करेल, असे मंत्री शंभूराज देसाई यांनी सांगितले.विरोधी पक्षनेते अंबादास दानवे यांनी औचित्याच्या मुद्द्याद्वारे जितेंद्र आव्हाड आणि गोपीचंद पडळकर यांच्या कार्यकर्त्यांमध्ये झालेल्या मारामारीच्या घटनेवर सविस्तर चर्चेची मागणी केली. सत्ताधारी पक्षाचा आमदार मारहाण करण्यासाठी आपल्या कार्यकर्त्याला उसकवत असल्याचे दिसून येते. पोलिस आरोपीला तंबाखू मळून देत असल्याचे चित्रफितीत दिसत आहे, असेही दानवे म्हणाले.शशिकांत शिंदे यांनाही या विषयावर चर्चेची मागणी केली.

# राजकारणासाठी घुसखोरीला प्रोत्साहन

## सत्तारूढ तृणमूल काँग्रेसवर मोदी यांनी हल्लाबोल केला

| नवी दिल्ली |
प्रतिनिधी : महाईन्यूज |

**पश्चिम बंगालमध्ये सत्ताधारी तृणमूल काँग्रेस पक्षाने मतपेढीच्या राजकारणासाठी घुसखोरीला प्रोत्साहन देऊन बंगाली अस्मिता आणि राष्ट्रीय सुरक्षा धोक्यात आणली. मुख्यमंत्री ममता बॅनर्जी यांच्या सरकारने तुष्टीकरणाच्या राजकारणाच्या सर्व मर्यादा ओलांडल्या आहेत, असा आरोप पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी शुक्रवारी केला.**




पश्चिम बंगालमध्ये ५,४०० कोटी रुपयांच्या विकास प्रकल्पांचे उद्घाटन पंतप्रधान मोदी यांच्या हस्ते झाले. या वेळी सभेला संबोधित करताना ते म्हणाले, की 'भाजप हा एकमेव असा पक्ष आहे जो बंगाली अस्मितेचा आदर करतो आणि त्यांचे रक्षण करतो. ज्या राज्यात भाजपचे सरकार आहे तिथे बंगाली लोकांचा आदर केला जातो.' 'पश्चिम बंगालसाठी भाजपची मोठी स्वप्ने आहेत. आम्हाला एक समृद्ध, विकसित बंगाल बनवायचा आहे. येथे सुरू होणारे सर्व प्रकल्प त्या स्वप्नाकडे जाणारे एक पाऊल आहेत.'घुसखोरी, हिंसाचाराला चिथावणी आणि बंगालच्या युवकांचे पलायन या मुद्यांवरून सत्तारूढ तृणमूल काँग्रेसवर मोदी यांनी हल्लाबोल केला. येथील सत्ताधारी पक्षाचा 'गुंडा कर' बंगालमधील गुंतवणूक रोखत आहे. राज्याची संसाधने माफियांच्या हाती गेली असून, सरकारी धोरणे जाणूनबुजून मंत्र्यांना उघड भ्रष्टाचारात सहभागी होण्यास सक्षम करण्यासाठी तयार केली जात आहेत,' असा आरोप त्यांनी केला.पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी शुक्रवारी बिहारच्या पूर्व चंपारण जिल्ह्यात ७,२०० कोटी रुपयांपेक्षा जास्त किमतीच्या विकास प्रकल्पांचे उद्घाटन केले. हे प्रकल्प रेल्वे, मत्स्यव्यवसाय आणि इतर क्षेत्रांशी संबंधित आहेत. दरम्यान, आगामी विधानसभा निवडणुकीपूर्वी मोतिहारी येथे एका जाहीर सभेला संबोधित करताना पंतप्रधानांनी 'बनायेंगे नया बिहार, फिर एक बार एनडीए सरकार' ही घोषणा दिली. तसेच पूर्व भारताच्या विकासासाठी बिहार अत्यंत महत्त्वाचा असल्याचे पंतप्रधान म्हणाले. बिहारच्या भूमीवरून 'ऑपरेशन सिंदूर'ची शपथ घेतली होती आणि जगाने त्याचे यश पाहिले असल्याचे पंतप्रधानांनी या वेळी सांगितले.पश्चिम बंगालमध्ये ५,४०० कोटी रुपयांच्या विकास प्रकल्पांचे उद्घाटन पंतप्रधान मोदी यांच्या हस्ते झाले. या वेळी सभेला संबोधित करताना ते म्हणाले, की 'भाजप हा एकमेव असा पक्ष आहे जो बंगाली अस्मितेचा आदर करतो आणि त्यांचे रक्षण करतो. ज्या राज्यात भाजपचे सरकार आहे तिथे बंगाली लोकांचा आदर केला जातो.' 'पश्चिम बंगालसाठी भाजपची मोठी स्वप्ने आहेत. आम्हाला एक समृद्ध, विकसित बंगाल बनवायचा आहे. येथे सुरू होणारे सर्व प्रकल्प त्या स्वप्नाकडे जाणारे एक पाऊल आहेत.'घुसखोरी, हिंसाचाराला चिथावणी आणि बंगालच्या युवकांचे पलायन या मुद्यांवरून सत्तारूढ तृणमूल काँग्रेसवर मोदी यांनी हल्लाबोल केला. तृणमूल काँग्रेसच्या काळात बंगालच्या आर्थिक स्थितीवर टीका करताना मोदी म्हणाले, की पश्चिम बंगाल हे उद्योग आणि गुंतवणूकदारांसाठी अयोग्य बनले आहे. येथील सत्ताधारी पक्षाचा 'गुंडा कर' बंगालमधील गुंतवणूक रोखत आहे. राज्याची संसाधने माफियांच्या हाती गेली असून, सरकारी धोरणे जाणूनबुजून मंत्र्यांना उघड भ्रष्टाचारात सहभागी होण्यास सक्षम करण्यासाठी तयार केली जात आहेत,' असा आरोप त्यांनी केला.पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी शुक्रवारी बिहारच्या पूर्व चंपारण जिल्ह्यात ७,२०० कोटी रुपयांपेक्षा जास्त किमतीच्या विकास प्रकल्पांचे उद्घाटन केले. हे प्रकल्प रेल्वे, मत्स्यव्यवसाय आणि इतर क्षेत्रांशी संबंधित आहेत.

### 7,200 कोटींच्या प्रकल्पांचे उद्घाटन

दरम्यान, आगामी विधानसभा निवडणुकीपूर्वी मोतिहारी येथे एका जाहीर सभेला संबोधित करताना पंतप्रधानांनी 'बनायेंगे नया बिहार, फिर एक बार एनडीए सरकार' ही घोषणा दिली. तसेच पूर्व भारताच्या विकासासाठी बिहार अत्यंत महत्त्वाचा असल्याचे पंतप्रधान म्हणाले. बिहारच्या भूमीवरून 'ऑपरेशन सिंदूर'ची शपथ घेतली होती आणि जगाने त्याचे यश पाहिले असल्याचे पंतप्रधानांनी या वेळी सांगितले.पश्चिम बंगालमध्ये ५,४०० कोटी रुपयांच्या विकास प्रकल्पांचे उद्घाटन पंतप्रधान मोदी यांच्या हस्ते झाले. या वेळी सभेला संबोधित करताना ते म्हणाले, की 'भाजप हा एकमेव असा पक्ष आहे जो बंगाली अस्मितेचा आदर करतो आणि त्यांचे रक्षण करतो. ज्या राज्यात भाजपचे सरकार आहे तिथे बंगाली लोकांचा आदर केला जातो.'

# छत्तीसगडमध्ये ईडीची मोठी कारवाई

## वाढदिवसाच्या दिवशीच माजी मुख्यमंत्र्यांच्या मुलाला अटक

| नवी दिल्ली |
प्रतिनिधी : महाईन्यूज |

**छत्तीसगडमधून एक मोठी बातमी समोर येत आहे. मद्य घोटाळा प्रकरणात सक्तवसुली संचालनालयाने (ईडी) काँग्रेसचे माजी मुख्यमंत्री आणि वरीष्ठ नेते भूपेश बघेल यांच्या मुलाला अटक केली आहे. ईडी अधिकाऱ्यांनी पहाटे टाकलेल्या छाप्यानंतर चैतन्य बघेल यांना भिलाई येथील त्यांच्या निवासस्थानावरून ताब्यात घेण्यात आले आहे. भूपेश बघेल यांच्या नेतृत्वाखालील काँग्रेस सरकारच्या कार्यकाळात झालेल्या कथित मद्य घोटाळा प्रकरणात ही अटक करण्यात आली आहे.**





ईडीने दिलेल्या माहितीनुसार, छत्तीसगडमधील कथित घोटाळ्यात २१०० कोटी रुपयांपेक्षा अधिक रकमेचा गैरव्यवहार झाला होता. ईडीची अशी माहिती आहे की, घोटाळ्यातील निधीचा काही भाग चैतन्य बघेल आणि त्यांच्या जवळच्या सहकाऱ्यांनी चालवलेल्या रिअल इस्टेट कंपन्यांद्वारे लाँडरिंग करण्यात आला होता. ईडीचा मनी लाँडरिंग खटला छत्तीसगड भ्रष्टाचार विरोधी ब्युरो (एसीबी) ने नोंदवलेल्या प्रथम माहिती अहवालावर (एफआयआर) आधारित आहे. या अहवालात माजी उत्पादन शुल्क मंत्री कवासी लखमा यांच्यासह ७० व्यक्ती आणि संस्थांची राज्याच्या मद्य धोरणाशी संबंधित भ्रष्टाचारात कथित भूमिकेसाठी नावे आहेत. अटक आणि छाप्यावर प्रतिक्रिया देताना भूपेश बघेल यांनी केंद्र सरकारवर जोरदार टीका केली आणि केंद्र सरकार विरोधी पक्षांचा आवाज दाबण्याचा प्रयत्न करत असल्याचे म्हटले.बघेल यांनी रायपूरमधील माध्यमांना सांगितले, "विधानसभेच्या अधिवेशनाच्या शेवटच्या दिवशी, जेव्हा आम्ही सभागृहात अदानी मुद्दा उपस्थित करण्याच्या तयारीत होतो, तेव्हा मोदी आणि शहा यांनी त्यांच्या मालकांना खूश करण्यासाठी ईडीला माझ्या घरी पाठवले. ते देशभरातील विरोधी नेत्यांना लक्ष्य करत आहेत. लोकशाहीचा गळा दाबण्याचा प्रयत्न करत आहेत.

### मतदानाच्या अधिकारापासून वंचित

त्यांनी केंद्र सरकारद्वारे ईडी, सीबीआय, आयकर आणि डीआरआय सारख्या तपास संस्थांचा गैरवापर केला जात असल्याचा आरोप केला. ते म्हणाले, "एकीकडे निवडणूक आयोग बिहारमधील मतदारांना मतदानाच्या अधिकारापासून वंचित करत आहेत, तर दुसरीकडे या संस्थांना विरोधी पक्षांवर हल्ला करण्यासाठी शस्त्र म्हणून वापरले जात आहे. धील कथित घोटाळ्यात २१०० कोटी रुपयांपेक्षा अधिक रकमेचा गैरव्यवहार झाला होता. ईडीची अशी माहिती आहे की, घोटाळ्यातील निधीचा काही भाग चैतन्य बघेल आणि त्यांच्या जवळच्या सहकाऱ्यांनी चालवलेल्या रिअल इस्टेट कंपन्यांद्वारे लाँडरिंग करण्यात आला होता. ईडीचा मनी लाँडरिंग खटला छत्तीसगड भ्रष्टाचार विरोधी ब्युरो (एसीबी) ने नोंदवलेल्या प्रथम माहिती अहवालावर (एफआयआर) आधारित आहे.

# थोडं तुझं आणि थोडं माझं' फेम मानसी झाली भावुक

'थोडं तुझं आणि थोडं माझं' ही स्टार प्रवाह वाहिनीवरील लोकप्रिय मालिका आहे. या मालिकेत शिवानी सुर्वे आणि समीर परांजपे हे प्रमुख भूमिकेत आहेत. तर अभिनेत्री मानसी कुलकर्णीने खलनायिकेची भूमिका साकारली आहे. सतत येणाऱ्या ट्विस्टमुळे मालिकेत पुढे काय होणार, ही प्रेक्षकांना उत्सुकता असते. आता मात्र मालिकेतील कथानकामुळे नाही तर मालिकेतील एका अभिनेत्रीने शेअर केलेली पोस्ट चर्चेचा विषय ठरत आहे. मालिकेत छाया भूमिका साकारणाऱ्या अभिनेत्रीने सोशल मीडियावर शेअर केलेली पोस्ट लक्ष वेधून घेत आहे. अभिनेत्री मानसी घाटेने सोशल मीडियावर एक व्हिडीओ शेअर केला आहे. ज्यामध्ये तिने तिला आजाराला सामोरे जावे लागल्याचे सांगितले. तिने या व्हिडीओमध्ये काही फोटो शेअर केले. तीने त्यावर लिहिले की सतत अंगावर सूज येत होती आणि हिमोग्लोबिन कमी होत होते. त्यानंतर रक्ताच्या चाचण्या झाल्या. बायोप्सी, वॉटर टॅपिंग, एन्डोस्कोपी असं बरंच काही केलं. रोज स्वत: ला मॉनिटर करणं आणि खूप गोळ्या खाणं, हे सुरू होतं. पुढे जेव्हा ती बरी होऊन सेटवर परतली तेव्हा सेटवरील सर्वांनी तिचं ज्या पद्धतीने स्वागत केले, त्याचा व्हिडीओ तिने शेअर केला. त्यावर लिहिले, "अखेर तीन महिन्यांच्या आरामानंतर मी पुन्हा एकदा कामाला सुरूवात करणार होते.मनात थोडी भीती होतीच. मला हे झेपेल का? मी इतका वेळ शूटिंग करू शकेन का? असा प्रश्न सगळ्यांना पडला होता. पण स्वामींची कृपा आणि माझ्या प्रोड्यूसर, दिग्दर्शक, सहकलाकार, माझं कुटुंब, मित्र परिवार या सर्वांच्या भक्कम आधारामुळे आणि त्यांच्या विश्वासामुळे आज मी उभी राहू शकले.या व्हिडीओमध्ये अभिनेत्री भावुक असल्याचे दिसत आहे. पुढे तिने लिहिले, "आपल्यावर प्रेम करणारे इतके लोक आपल्या आजुबाजूला आहेत, हे पाहून मन पुन्हा पुन्हा भरुन येत होतं. माझी आई, दादा, वहिनी, नवरा आणि बाकिचे नातलग या सर्वांनीच खूप आधार दिला. हे माझे सहकलाकार नसून माझे दुसरे कुटुंब आहे. रोज फोन करून माझ्या प्रकृतीची विचारपूस करणं आणि या आजारातून लवकरात लवकर बाहेर पडावं यासाठी सगळेच आपापल्या परीने प्रयत्न करत होते. आपल्या पडत्या काळात आपले जवळचे आणि आपण जोडलेली माणसं आपल्या मदतीला येत असतात.

# मराठी अभिनेत्रीची लगीनघाई!




मराठी अभिनयविश्वात लगीनघाई सुरू आहे. रेश्मा शिंदे, किरण गायकवाड व वैष्णवी कल्याणकर, श्रद्धा रानडे, शाल्व किंजवडेकर आणि आता शिवानी सोनारपाठोपाठ आणखी एक मराठी अभिनेत्री लग्नबंधनात अडकणार आहे. साखरपुडा केल्यानंतर जवळपास वर्षभराने लग्न करणार आहे. सध्या तिच्या बॅचलर पार्टीचे फोटो चर्चेत आहेत. 'बलोच' या मराठी चित्रपटात झळकलेली अभिनेत्री तेजश्री जाधव लवकरच लग्न करणार आहे. तिने इन्स्टाग्रामवर तिच्या बॅचलर पार्टीचे काही फोटो पोस्ट केले आहेत. यात तेजश्रीबरोबर तिचे मित्र-मैत्रिणी दिसत आहेत. तेजश्रीने तिच्या बॅचलर पार्टीमध्ये एक छान शॉर्ट वनपीस घातला होता. तिने केक हातात घेऊन काढलेले काही फोटो पोस्ट केले आहेत.दरम्यान, तेजश्रीने १४ मार्च २०२४ रोजी साखरपुडा उरकला होता. तिच्या होणाऱ्या पतीचे नाव रोहन सिंह आहे. रोहनने तिला साखरपुड्याच्या काही दिवसांआधी समुद्रकिनारी प्रपोज केलं होतं. त्यानंतर पारंपरिक पद्धतीने त्यांनी साखरपुडा केला. आता तिने तिच्या बॅचलर पार्टीचे फोटो पोस्ट केले आहेत. तेजश्री व रोहन लवकरच लग्नबंधनात अडकणार आहेत. तेजश्रीने अद्याप तिच्या लग्नाची तारीख जाहीर केलेली नाही.तेजश्री दाक्षिणात्य चित्रपटात आपल्या अभिनयाची छाप उमटवणारी मराठी मुलगी म्हणून ओळखली जाते. तेजश्रीने २०१६ मध्ये अभिनेत्री सोनाक्षी सिन्हाची मुख्य भूमिका असलेल्या 'अकिरा' चित्रपटातून बॉलीवूडमध्ये पदार्पण केलं होतं. त्यानंतर ती 'अट्टी' या तामिळ चित्रपटात झळकली होती. यानंतर ती 'माधुरी टॉकीज', 'द जोकर : अ स्ट्रेंज किडनॅपर' या हिंदी वेब सीरिजमधून प्रेक्षकांच्या भेटीला आली.

# तेजश्री अपूर्वाच्या मैत्रीत दुरावा

'स्टार प्रवाह' वाहिनीवरील 'प्रेमाची गोष्ट' मालिका सध्या एका कारणामुळे खूप चर्चेत आली आहे, ते म्हणजे तेजश्री प्रधान. 'प्रेमाची गोष्ट' मालिकेत तेजश्री प्रधानने मुक्ता ही भूमिका साकारली होती. पण काही दिवसांपूर्वी तेजश्रीने मालिका सोडल्याची धक्कादायक माहिती समोर आली. त्यामुळे प्रेक्षकांमध्ये नाराजीचे सूर पसरले आहेत. तेजश्रीच्या अचानक एक्झिटमुळे अनेक प्रश्नदेखील उपस्थित झाले आहेत. पण, याबाबत तेजश्रीने अद्याप मौन धारण केल्याचं पाहायला मिळत आहे.'प्रेमाची गोष्ट' मालिकेत तेजश्री प्रधानची जागा अभिनेत्री स्वरदा ठिगळेने घेतली आहे. स्वरदा आता मुक्ताच्या भूमिकेत पाहायला मिळणार आहे. 'प्रेमाची गोष्ट'मधील सावनी म्हणजे अभिनेत्री अपूर्वा नेमळेकरने स्वरदासाठी खास पोस्ट शेअर केली होती. शिवाय यानिमित्ताने दोघी सेलिब्रेशनदेखील करताना दिसल्या.

# पण मी खूश नाही



'बिग बॉस मराठी'च्या पाचव्या पर्वामुळे मराठमोळी निक्की तांबोळी घराघरांत पोहोचली. निक्कीने काही दाक्षिणात्य चित्रपटही केले आहेत. आता ती 'सेलिब्रिटी मास्टरशेफ'मधून प्रेक्षकांच्या भेटीला येणार आहे. या शोचा एक प्रोमो व्हायरल झाला आहे, ज्यामध्ये निक्की ढसाढसा रडताना दिसत आहे, त्यामुळे निक्कीला नेमकं झालंय तरी काय? असा प्रश्न चाहत्यांना पडला आहे. सोनी टीव्हीच्या अधिकृत इन्स्टाग्राम अकाउंटवरून 'सेलिब्रिटी मास्टरशेफ'चा एक प्रोमो शेअर करण्यात आला आहे, ज्यामध्ये ती रडताना दिसते. "मागील तीन वर्षांत मी हिट रिॲलिटी शो दिले आहेत, पण तरीही मी खूश नाहीये. मी आनंद शोधतेय," असं निक्की रडत रडत म्हणते. यावेळी ज्येष्ठ अभिनेत्री उषा नाडकर्णी यांच्या डोळ्यांतही पाणी येतं. त्यानंतर शेफ रणवीर ब्रार व फराह खान निक्कीशी बोलताना दिसतात. निक्कीला ती काय बनवतेय, असं ते विचारतात. त्याचं निक्की उत्तर देते. यावेळी निक्की गोंधळलेली दिसते. चिप्स कुठे आहेत, असं रणवीर तिला विचारतात. त्यावर ती बनवू शकली नाही असं उत्तर देते. हे ऐकून फराह खान व विकास खन्ना यांना धक्का बसतो.पुढे निक्की रडत म्हणते, "मी खूप मेहनत करतेय, मला शो मिळत आहेत, पण मी खूश नाहीये. कधी कधी मला वाटतं की मी या सगळ्या गोष्टींसाठी पात्र नाही." निक्कीचं बोलणं संपल्यावर हा प्रोमो संपतो. निक्की नेमकी कशामुळे रडते, काय घडलंय, ते एपिसोड प्रसारित झाल्यावरच कळेल.निकी तांबोळीच्या कामाबद्दल बोलायचं झाल्यास तिने मॉडेल म्हणून करिअरची सुरुवात केली होती. २०१९ मध्ये, तिने 'चिकाती गडिलो चिथाकोटुडू' या तेलुगू हॉरर कॉमेडी चित्रपटातून अभिनयात पदार्पण केलं होतं.

# गायक दर्शन रावलने बेस्ट फ्रेंडशी बांधली लग्नगाठ

'लव्हयात्री' मधील चोगाडा' आणि 'इश्क विश्क रिबाउंड' मधील 'सोनी सोनी' सारख्या गाण्यांचा गायक दर्शन रावल लग्नबंधनात अडकला आहे. त्याने इन्स्टाग्रामवर त्याच्या लग्नातील काही सुंदर फोटो शेअर करून चाहत्यांना आश्चर्याचा धक्का दिला आहे. दर्शनने त्याची बेस्ट फ्रेंड धरल सुरेलिया हिच्याशी एका खासगी सोहळ्यात लग्नगाठ बांधली. दर्शन रावलने इन्स्टाग्रामवर 'माय बेस्ट फ्रेंड फॉरेव्हर' असं कॅप्शन देत लग्नाचे फोटो शेअर केले आहेत. सर्व फोटोंमध्ये दर्शन व धरल दोघेही हसत लग्नाच्या विधी करताना दिसत आहेत. दर्शन रावलने लग्नात आयवही रंगाची शेरवानी घातली होती, तर त्याच्या पत्नीने, धरलने पारंपरिक लाल लेहेंगा निवडला होता. या कपड्यांबरोबर मॅचिंग दागिने घालून तिने तिचा लूक



पूर्ण केला होता. पारंपरिक पद्धतीने दोघांचं लग्न झालं. लग्नात दोघेही खूप सुंदर दिसत आहेत.दर्शनने लग्नाचे फोटो पोस्ट केल्यावर चाहते व त्याचे मित्र-मैत्रिणी कमेंट्स करत आहेत. सर्वजण दर्शन व धरलचं आयुष्यातील नवीन प्रवासासाठी अभिनंदन करत आहेत. तसेच लग्नात दोघेही सुंदर दिसत असल्याच्या कमेंट्स अनेकांनी केल्या आहेत.दर्शन रावल तरुणाईत खूप लोकप्रिय आहे. ११ वर्षांपूर्वी २०१४ मध्ये 'इंडियाज रॉ स्टार'च्या पहिल्या सीझनमध्ये दर्शन रावल स्पर्धक म्हणून सहभागी झाला होता. तो हा शो जिंकू शकला नव्हता. पहिल्या पर्वाचा विजेता ओडिशाचा ऋतुराज मोहंती ठरला होता. ऋतुराजकडून हरलेल्या दर्शनची या शोमध्ये गायलेली गाणी खूप गाजली होती. त्या शोमुळे त्याचा मोठा चाहतावर्ग तयार झाला.या शोने दर्शनला एक व्यासपीठ उपलब्ध करून दिले आणि त्याने बॉलीवूडमध्ये पार्श्वगायक म्हणून आपल्या करिअरची सुरुवात केली. २०१५ मध्ये त्याने हिमेश रेशमियाचे आभार, जो शोचा जज होता.

# मँचेस्टरआधी टीम इंडियाला धक्का!

## अर्शदिप सिंग सराव करत असताना दुखापतग्रस्त झाला आहे

। नवी दिल्ली ।
वृत्तसंस्था : महाईन्यूज

**भारत आणि इंग्लंड यांच्यात सुरू असलेल्या ५ कसोटी सामन्यांच्या मालिकेतील चौथा सामना मँचेस्टरमध्ये रंगणार आहे. हा सामना मालिकेच्या दृष्टीने भारतीय संघासाठी अतिशय महत्वाचा असणार आहे. कारण २ सामने जिंकून इंग्लंडचा संघ मालिकेत २-१ ने आघाडीवर आहे. त्यामुळे मालिका जिंकायची असेल तर चौथा सामना जिंकणं अतिशय महत्वाचं असणार आहे. या सामन्याआधी भारतीय संघाला मोठा धक्का बसला आहे. संघातील वेगवान गोलंदाज अर्शदीप सिंग दुखापतग्रस्त झाला आहे.**



अर्शदीप सिंगला इंग्लंड दौऱ्यासाठी भारतीय संघात संधी देण्यात आली आहे. पण त्याला पदार्पणाची संधी दिली गेलेली नाही. आता चौथ्या कसोटीपूर्वी सरावादरम्यान गोलंदाजी करत असताना साई सुदर्शनने मारलेला चेंडू त्याच्या हाताला लागल्याने दुखापत झाली आहे. मात्र, मेडिकल टीमने त्वरित त्याच्यावर उपचार केले.लॉर्ड्स कसोटी सामन्यातील पराभवानंतर भारतीय संघाने मँचेस्टर कसोटी जिंकण्यासाठी जोरदार सराव सुरू केला आहे. या सामन्यासाठी जर कुठल्याही गोलंदाजाला विश्रांती दिली जाणार असेल, तर २६ वर्षीय अर्शदीप सिंगला पदार्पणाची संधी दिली जाऊ शकते. पण त्याला संधी मिळणार की नाही, हे त्याची दुखापत किती गंभीर आहे यावर अवलंबून असणार आहे.भारतीय संघाचे सहाय्यक प्रशिक्षक रायन डे डोशेट म्हणाले, " साई सुदर्शन फलंदाजी करत असताना अर्शदिप सिंग गोलंदाजीला आला. साई सुदर्शनने मारलेला शॉट अडवण्यासाठी अर्शदीप सिंगने हात टाकला. पण त्याच्या हाताला दुखापत झाली. मेडिकल टीम त्याला डॉक्टरकडे घेऊन गेली आहे. त्याला टाके मारावे लागतील की नाही हे लवकरच कळेल.जसप्रीत बुमराह या मालिकेतील ५ पैकी ३ सामने खेळणार हे आधीपासून ठरलं होतं. त्यामुळे दुसऱ्या सामन्यात त्याला विश्रांती दिली गेली होती. आता तो शेवटच्या २ पैकी एका सामन्यात खेळताना दिसेल. पण मँचेस्टर कसोटी ही भारतीय संघासाठी महत्वाची असणार आहे. त्यामुळे तो या सामन्यात खेळताना दिसेल. त्यानंतर शेवटच्या कसोटीत तो खेळणार की नाही, याबाबत निर्णय घेतला जाईल.अर्शदीप सिंगला इंग्लंड दौऱ्यासाठी भारतीय संघात संधी देण्यात आली आहे. पण त्याला पदार्पणाची संधी दिली गेलेली नाही. आता चौथ्या कसोटीपूर्वी सरावादरम्यान गोलंदाजी करत असताना साई सुदर्शनने मारलेला चेंडू त्याच्या हाताला लागल्याने दुखापत झाली आहे. मात्र, मेडिकल टीमने त्वरित त्याच्यावर उपचार केले.लॉर्ड्स कसोटी सामन्यातील पराभवानंतर भारतीय संघाने मँचेस्टर कसोटी जिंकण्यासाठी जोरदार सराव सुरू केला आहे. या सामन्यासाठी जर कुठल्याही गोलंदाजाला विश्रांती दिली जाणार असेल, तर २६ वर्षीय अर्शदीप सिंगला पदार्पणाची संधी दिली जाऊ शकते. पण त्याला संधी मिळणार की नाही, हे त्याची दुखापत किती गंभीर आहे यावर अवलंबून असणार आहे.भारतीय संघाचे सहाय्यक प्रशिक्षक रायन डे डोशेट म्हणाले, " साई सुदर्शन फलंदाजी करत असताना अर्शदिप सिंग गोलंदाजीला आला. साई सुदर्शनने मारलेला शॉट अडवण्यासाठी अर्शदीप सिंगने हात टाकला.मेडिकल टीम त्याला डॉक्टरकडे घेऊन गेली आहे. त्याला टाके मारावे लागतील की नाही हे लवकरच कळेल.जसप्रीत बुमराह या मालिकेतील ५ पैकी ३ सामने खेळणार हे आधीपासून ठरलं होतं.

### जसप्रीत बुमराह खेळणार का?

त्यामुळे दुसऱ्या सामन्यात त्याला विश्रांती दिली गेली होती. आता तो शेवटच्या २ पैकी एका सामन्यात खेळताना दिसेल. पण मँचेस्टर कसोटी ही भारतीय संघासाठी महत्वाची असणार आहे. त्यामुळे तो या सामन्यात खेळताना दिसेल. त्यानंतर शेवटच्या कसोटीत तो खेळणार की नाही, याबाबत निर्णय घेतला जाईल.अर्शदीप सिंगला इंग्लंड दौऱ्यासाठी भारतीय संघात संधी देण्यात आली आहे. पण त्याला पदार्पणाची संधी दिली गेलेली नाही. आता चौथ्या कसोटीपूर्वी सरावादरम्यान गोलंदाजी करत असताना साई सुदर्शनने मारलेला चेंडू त्याच्या हाताला लागल्याने दुखापत झाली आहे. मात्र, मेडिकल टीमने त्वरित त्याच्यावर उपचार केले.लॉर्ड्स कसोटी सामन्यातील पराभवानंतर भारतीय संघाने मँचेस्टर कसोटी जिंकण्यासाठी जोरदार सराव सुरू केला आहे. या सामन्यासाठी जर कुठल्याही गोलंदाजाला विश्रांती दिली जाणार असेल, तर २६ वर्षीय अर्शदीप सिंगला पदार्पणाची संधी दिली जाऊ शकते.

# नरम पडणाऱ्या ड्यूक्स चेंडूंची तपासणी

## उत्पादक कंपनीने चेंडूंची सखोल तपासणी करण्याची तयारी दर्शविली

। नवी दिल्ली ।
वृत्तसंस्था : महाईन्यूज

**भारत आणि इंग्लंड संघांदरम्यान सुरू असलेल्या पाच कसोटी क्रिकेट सामन्यांच्या मालिकेतील पहिल्या तीन सामन्यांमध्ये वापरल्या गेलेल्या 'ड्यूक्स' चेंडूंवर टीका झाल्यानंतर उत्पादक कंपनीने चेंडूंची सखोल तपासणी करण्याची तयारी दर्शविली आहे.**




सध्या सुरू असलेल्या पाच सामन्यांच्या मालिकेत पार पडलेल्या तीनही सामन्यात वापरण्यात आलेले ड्यूक्स चेंडू सातत्याने नरम पडत होते. चेंडूचा कडकपणा अजिबात टिकून राहत नव्हता. त्यामुळे अनेकदा पंचांना चेंडू बदलावा लागला. साधारण तीस षटकांनंतरच चेंडू खराब होत होते. या सगळ्याचा परिणाम रोजचा खेळ लांबण्यावर झाला होता.इंग्लंड गोलंदाजांनीही या चेंडूविषयी नाराजी व्यक्त केली होती. मात्र, भारतीय कर्णधार शुभमन गिल आणि इंग्लंडचा माजी वेगवान गोलंदाज स्टुअर्ट ब्रॉड यांनी थेट टीका करून चेंडू खराब असल्याचे म्हटले होते. या टीकेनंतर इंग्लंड आणि वेल्स क्रिकेट मंडळ वापरलेले चेंडू शक्य तेवढे गोळा करून उत्पादक कंपनीकडे परत करणार आहे.

### नव्या चेंडूवर बूमराने तीन गडी बाद

"आम्ही हे सर्व चेंडू सामन्यातून काढून घेऊ. त्यांची सर्वांगीण तपासणी करू," असे ड्यूक्स कंपनीचे मालक दिलीप जाजोदिया यांनी सांगितले. "कसोटी मालिकेसाठी वापरले जाणारे चेंडू यजमान मंडळ निश्चित करते. आम्ही या चेंडूंचे पुनरावलोकन करू. आम्हाला काही बदल करावेसे वाटल्यास ते करू. कडक करावे लागले, तर ते देखील करू," असेही जाजोदिया म्हणाले. इंग्लंडमधील मालिकेत ड्यूक्स चेंडू वापरला जातो. भारतातील मालिका 'एसजी' चेंडूने खेळविल्या जातात. तर ऑस्ट्रेलियात 'कुकाबुरा' चेंडूला पसंती असते. इंग्लंडमध्ये ड्यूक्स कंपनी १७६० पासून चेंडूची निर्मिती करत आहे. अलीकडच्या काळात कसोटीसह अगदी कौंटी क्रिकेटमध्येही त्यांना अशाच प्रकारच्या समस्यांना तोंड द्यावे लागले आहे. लॉर्ड्स कसोटीत दुसऱ्या दिवशी सकाळच्या सत्रात पहिल्या तासातच दुसरा नवा चेंडू बदलावा लागला. या बदललेल्या चेंडूवर कर्णधार गिल समाधानी नव्हता. नव्या चेंडूवर बूमराने तीन गडी बाद केले होते.

स्मार्ट PCMC SMART CITY

# महाईन्यूज ™

ePaper

। शनिवार ।

। दि. 19 जुलै 2025।

epaper.mahaenews.com

पिंपरी-चिंचवड, मावळ आवृत्ती

Pune District Education Association's
Seth Govind Raghunath Sable
College of Pharmacy
Saswad, Pune - 412301
D.Pharm/B.Pharm/M.Pharm/Ph.D.


PDEA

Pharmacy Council of India | SPPU Affiliation | NAAC Accreditation | Maharashtra State Board of Technical Education

## Facilitation & Verification Center for F. Y. B.Pharm, F.Y.M.Pharm,and Direct S.Y.B.Pharm Admission 2025–26

### Admission Schedule for F.Y.B.Pharm

| | |
|---|---|
| Online Registration & Document Upload | 07 – 21July 2025 (10:00AM-5:00PM) |
| Document Verification & Form Confirmation (Physical Scrutiny at FC) | 08 – 22 July 2025 (10:00AM-5:00 PM) |
| Display of Provisional Merit List | 25 July 2025 |
| Grievance Submission (Online / at FC) | 26– 28 July 2025 (10:00AM-5:00 PM) |
| Final Merit List | 31 July 2025 |



Your Trusted Facilitation Centre!

FC Code 6372

Important Note:
- Bring all original + Xerox copies of documents
- Late registrations after 14 July are for Non-CAP seats only

"Your First Step Towards a Bright Pharmacy Career!"

Confirm Your Application Now!



Visit Us for Physical Scrutiny

PDEA's Seth Govind Raghunath Sable College of Pharmacy, Saswad

Timings: 10:00 AM – 5:00 PM (including Saturday & Sunday)

Contact: Dr. Nilesh Bhosale – 9860503549

## कायद्याचे उल्लंघन करणाऱ्यांना कठोर शिक्षा व्हावी

# गोवंश हत्या कायदा अधिक कडक करा!

## शंकर जगताप : दोषींना 5 वर्षांची शिक्षा व 1 लाख दंड करण्याची विधानसभेत मागणी

| पिंपरी- चिंचवड | प्रतिनिधी : महाईन्यूज |

**पिंपरी-चिंचवड नवनगर विकास प्राधिकरणाच्या हद्दीतील प्रॉपर्टी "फ्री होल्ड" करण्याबाबत राज्य सरकार सकारात्मक आहे. सिडको आणि पीएमआरडीच्या हद्दीतील मिळकती ज्या प्रमाणे फ्री होल्ड करण्याचा निर्णय महायुती सरकारने घेतला. त्याच धर्तीवर पीसीएमसीच्या कार्यक्षेत्रातील प्राधिकरणाच्या प्रॉपर्टी फ्री होल्ड करण्यासाठी सरकार सकारात्मक आहे. महसूल व वित्त विभागाकडे प्रस्ताव पाठवला आहे. त्याबाबत कॅबिनेट मंत्रीमंडळाच्या बैठकीत निर्णय होईल, असे आश्वासन कॅबिनेट मंत्री उदय सामंत यांनी दिले.**




पिंपरी चिंचवड- महाराष्ट्रात लागू असलेल्या गोवंश हत्या बंदी कायद्याची अधिक प्रभावी अंमलबजावणी व्हावी, तसेच या कायद्याचे उल्लंघन करणाऱ्यांना पाच वर्षांपर्यंत कठोर शिक्षा व एक लाख रुपये दंडाची तरतूद करण्यात यावी, अशी मागणी आमदार शंकर जगताप यांनी विधानसभेत (शुक्रवारी) औचित्याच्या मुद्द्याद्वारे केली.

शंकर जगताप यांनी स्पष्टपणे नमूद केले की, महाराष्ट्र प्राणी संरक्षण अधिनियम १९७६ व त्यातील १९९५ आणि २०१५ मधील सुधारणा कायद्यानुसार संपूर्ण राज्यात गोवंश हत्या, वाहतूक, विक्री आणि अवैध व्यापारावर बंदी आहे. तरीही अनेक ठिकाणी या कायद्याचे सर्रास उल्लंघन होत असून, घरांमध्ये अथवा गुप्त ठिकाणी बेकायदेशीर गोवंश कत्तल सुरू आहे.

जगताप यांनी अधोरेखित केले की, दोषींवर फक्त कायदेशीर कारवाई पुरेशी नाही, तर पाच वर्षे सक्तमजुरीची शिक्षा आणि एक लाख रुपये दंड अशी कठोर शिक्षा ठोठावणारा कायदा व्हावा. यासाठी कलम ५अ, ५ब, ५क आणि ५ड अंतर्गत स्पष्ट तरतुदींची काटेकोर अंमलबजावणी गरजेची आहे.

याशिवाय गोरक्षकांना त्यांच्या सुरक्षेची गरज असल्याचे सांगत जगताप यांनी या कार्यात अडथळा आणणाऱ्यांवर भारतीय दंड संहितेच्या कलम ३५३ अंतर्गत गुन्हे दाखल करण्याचा विशेष अधिकार पोलिस आणि पशुसंवर्धन विभागाला द्यावा, अशी मागणी केली.

## शिवशक्ती भिमशक्तीचा पिंपरीमध्ये आनंदोत्सव!

## शिवसेना आणि रिपब्लिकन सेना युतीचे स्वागत

| पिंपरी-चिंचवड | प्रतिनिधी : महाईन्यूज |

**शिवसेना आणि रिपब्लिकन सेना एकत्र आली आहे. याची घोषणा मुंबईमध्ये झाल्यानंतर राज्यभरामध्ये कार्यकर्ते आनंद उत्सव साजरा करत आहेत. याच पार्श्वभूमीवर पिंपरी येथे शुक्रवारी (दि 18 जुलै) डॉ. बाबासाहेब आंबेडकर पुतळ्यासमोर शिवसेना आणि रिपब्लिकन सेना यांच्या कार्यकर्त्यांनी, पदाधिकाऱ्यांनी एकत्र येऊन एकमेकांना पेढे भरवले. युतीचा जल्लोष केला आणि आगामी महापालिका निवडणुकीत 'एक दिलाने' काम करण्याचा संकल्प सोडला.**

**पिंपरीमध्ये शिवसेना आणि रिपब्लिकन सेनेच्या कार्यकर्त्यांनी पेढे वाटत केला जल्लोष**




आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर महाराष्ट्रात मोठ्या घडामोडी घडत आहे. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी नुकतीच डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे नातू आनंदराज आंबेडकर यांच्या नेतृत्वाखालील रिपब्लिकन सेनेसोबत युती केली. ही युती आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांमध्ये राज्यातील अनेक भागांमध्ये 'गेम चेंजर' ठरेल असे म्हटले जात आहे.

पिंपरीतील कार्यकर्त्यांनी देखील या युतीचे स्वागत केले आहे. शिवसेना आणि रिपब्लिकन सेनेच्या कार्यकर्त्यांनी डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर पुतळ्याजवळ एकत्र येत आनंद उत्सव साजरा केला यावेळी जल्लोष करत कार्यकर्त्यांनी एकमेकांना पेढे देखील भरवले यावेळी शिवसेना उपनेत्या सुलभा उबाळे, शिवसेना जिल्हाप्रमुख बाळासाहेब वाल्हेकर, शहर संघटक संतोष सौंदणकर, शिवसेना उपजिल्हाप्रमुख दिलीप पांढरकर, चिंचवड संघटक सुनील पालकर, युवा सेना मावळ जिल्हाप्रमुख सायली साळवी, पिंपरी विधानसभा प्रमुख सुवर्णा तडसरे, चिंचवड विधानसभा प्रमुख प्रियंका चव्हाण, शारदा वाघमोडे , पिंपरी विधानसभा उपसंघटिका सुवर्ण कुटे, पिंपळे गुरव विभाग संघटिका पोर्णिमा आमराव, स्नेहा गायकवाड, संगीता गायकवाड, इंदू जाधव, तेजश्री ढोरे, अनिता शर्मा, सुनिता हरपळे, सुनंदा दासरे, अर्चना गुरव, सुनिता मुळक, शीला अनपन, तसलीम तांबोळी, कविता कोंडे देशमुख तसेच मुकुंद ओव्हाळ, प्रशांत कडलक, प्रकाश ताटे आदी उपस्थित होते. रिपब्लिकन सेने तर्फे आनंद उत्सव साजरा करण्यासाठी शहराध्यक्ष राजू गायकवाड, संघटक रमेश कांबळे, भरत वाघमारे, मुकुंद रंधवे, भीमराव सुरवसे हे उपस्थित होते.

युवा सेना शिरूर लोकसभा अध्यक्ष अजिंक्य उबाळे, तसेच संतोष भोसले, सुहास तळेकर, अनिकेत येलूरकर, विशाल कोतवाल, शुद्धोधन भालेराव, अमित शिंदे, अभिषेक सुरवसे, किशोर शिंदे, शुभम महाडिक, निलेश हाके यांनी देखील कार्यकर्त्यांना पेढे भरवले. शिवशक्ती भीमशक्तीचा युवा सेनेच्या कार्यकर्त्यांच्या वतीने मोठा जल्लोष करण्यात आला.

> शिवसेना आणि रिपब्लिकन सेना या दोन्ही सेना रस्त्यावर अन्यायाविरुद्ध लढणाऱ्या सेना आहेत. हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे यांचा वारसा घेऊन चालणारी शिवसेना आणि दुसरी भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या रक्ताचा वारसा घेऊन चालणारी सेना आहे. त्यामुळे आगामी काळात सर्वसामान्यांच्या विकासासाठी कार्यकर्ते एक दिलाने काम करतील. या माध्यमातून भविष्यात राज्यामध्ये शिवशक्ती भीमशक्तीची लाट पाहायला मिळेल.
>
> **–सुलभा उबाळे,** शिवसेना उपनेत्या


Priyadarshani
SCHOOL & JR. COLLEGE
ALANDI
PRIYADARSHANI GROUP OF SCHOOLS
42 Years of Excellence in Education
EDUCATING MIND & HEART
ADMISSIONS OPEN
FOR AY 2025-26
Holistic
Empowering
Learning
IT ALL STARTS HERE
42
YEARS OF ENRICHING EXPERIENCE OF EDUCATION
55+
NATIONAL & INTERNATIONAL AWARDS ACROSS OUR SCHOOLS
11+
CAMPUSES IN AND AROUND PUNE, MAHARASHTRA
17K+
17,000 STUDENTS ACROSS CAMPUSES
600+
TEACHING AND NON TEACHING STAFF
13K+
13,000 ALUMNI ACROSS GLOBE
PRIYADARSHANI GROUP OF SCHOOLS
BHOSARI | INDRAYANI NAGAR | MOSHI | CHAKAN | ALANDI | SHIVAJINAGAR | NANEKARWADI | WANOWRIE | SATARA
+91 8668755826
alandi@priyadarshanischools.org
www.priyadarshanischools.org


Express
Media Enterprises
Professional Live set up with live drone available..
Documentary
Weddings
Drone
Motion Graphics
Testimonials
Tutorial videos
Product Videos
Animation
Social Media Content
Promotional Videos
Real Estate
Corporate
Advertising
Events
PUNE
Contact: 9657767000/9370493922/9664188046